"महालक्ष्मी सरस व इतर प्रदर्शनाबाबत नेहमी विचारण्यात येणारी प्रश्ने"

१. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी काय पात्रता लागते?

उत्तरः- महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी खालील गोष्टीची आवश्यकता आहे -

अ. महिला स्वयंसहायता गट हा ग्रामीण भागातील असावा व तो उमेद अभियानाशी जोडलेला असावा.

ब. महिला स्वयंसहायता गट हा दर्जेदार उत्पादन करणारा असावा व उत्पादनाचे पॅकिंग / लेबलिंग आकर्षक असावे.

क. मागील एक दोन वर्षात त्यांनी सरस प्रदर्शनात सहभाग घेतलेला नसावा.

ड. संबंधीत महिला स्वयंसहायता गटाकडे FSSAI (Food Safety and Standards Authority of India) व उद्यम आधार परवाना असावा.

इ. महिला स्वयंसहायता गटाचे उत्पादन उमेद मार्ट व इतर ऑनलाईन ई-कॉमर्स पोर्टलवर उपलब्ध/नोंदणीकृत असावे.

२. सरस स्टॉलसाठी नोंदणी कशी व कधी करावी?

उत्तरः-सरस प्रदर्शनासाठी महिला स्वयंसहायता गटांनी त्यांच्या तालुक्यातील उमेद अभियान कार्यालयात नोंदणी करावयाची आहे. सरस प्रदर्शनाची तारीख निश्चित झाल्यानंतर सदरची नोंदणी करावयाची आहे. यासाठी महिला स्वयंसहायता गटांनी त्यांच्या तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयाशी व जिल्ह्यांतील जिल्हा परिषद/जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशी तथा समुदाय संसाधन व्यक्तीशी संपर्क करावा.

सरस प्रदर्शनामध्ये सहभागी होवु इच्छिणाऱ्या स्वयंसहायता गटांची nrlm.gov.in या पोर्टलवर तालुका अभियान कक्षामार्फत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली जाते.

३. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिला स्वयंसहायता गटांना महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होता येते का?

उत्तरः- महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या उत्पादनासाठीच असल्यामुळे महापालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रात असणा-या व्यक्तींना / समुहांना महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सामावुन घेतले जात नाही.

४. महानगर पालिका, नगरपंचायत क्षेत्रात कार्यरत महिला स्वयंसहायता गटांनी प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी काय करावे लागेल किंवा कुठे संपर्क करावा?

उत्तरः- त्यासाठी संबंधीतानी राष्ट्रीय नागरी आजिविका अभियान (NULM) या कार्यालयाशी अथवा त्यांच्या क्षेत्रातील संबंधीत महानगर पालिका/नगर परीषद, नगर पंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा.

५. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी कुठे अर्ज करावा लागतो ?

उत्तर:- महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी महिला स्वयंसहायता गटांनी आपल्या तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असणाऱ्या उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व जिल्ह्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयात कार्यरत असणाऱ्या उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालयाकडे अर्ज करावा.

सरस प्रदर्शनामध्ये सहभागी होवु इच्छिणाऱ्या स्वयंसहायता गटांची nrlm.gov.in या पोर्टलवर तालुका अभियान कक्षामार्फत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली जाते.

६. महालक्ष्मी सरस प्रदर्शनाशिवाय अजून ही इतर कोणत्या प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी महिला स्वयंसहायता गटांना असते ?

उत्तर:- राज्य स्तरावरील महालक्ष्मी सरस प्रदर्शनाशिवाय तालूका जिल्हा स्तरावर दिवाळी फराळ महोत्सव, श्री गणेश चतुर्थी प्रदर्शन, नवरात्र महोत्सव, इत्यादी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. त्यामध्ये स्थानिक समूहांना आपले उत्पादन विक्री व प्रदर्शनाचे संधी प्राप्त होते. या शिवाय इतर राज्यांनी आयोजित केलेल्या सरस आजिविका प्रदर्शनात सुध्दा काही निवडक स्वयंसहायता गटांना त्यांचे उत्पादन नाविन्यपूर्ण व दर्जेदार असल्यास सहभागी होण्याची संधी प्राप्त होते.

७. रेल्वे स्थानकावर व बस स्थानकावर महिला स्वयंसहायता गटांना स्टॉल लावण्याची काही योजना किंवा तशी काही व्यवस्था आहे का?

उत्तर:- होय, ग्रामीण भागातील महिला स्वयंसहायता गटांनी त्यांच्या जिल्हयातील रेल्वे स्थानकावर व बस स्थानकावर आपल्या उत्पादनाचे विक्री स्टॉल लावता येतो त्यासाठीचा सर्व खर्च अभियानातर्फे केला जातो. यासाठी सुध्दा आप-आपल्या जिल्ह्यातील / तालुक्यातील उमेद अभियानाच्या कार्यालयाशी संपर्क करावा.

८. राज्यस्तरीय सरस प्रदर्शन कधी भरविले जाते?

उत्तर:- साधारणत: डिसेंबर ते जानेवारी दरम्यान सरस प्रदर्शन मुंबई येथे भरविले जाते.

९. सरस प्रदर्शनासाठी महिला स्वयंसहायता गटांकडून अर्ज केव्हा मागविले जातात?

उत्तर:- सरस प्रदर्शनाची तारीख निश्चित झाल्यानंतर तालुका/ जिल्हा कार्यालयामार्फत स्वयंसहायता गटांची अर्ज/ नोंदणी केली जाते.

सरस प्रदर्शनामध्ये सहभागी होवु इच्छिणाऱ्या स्वयंसहायता गटांची nrlm.gov.in या पोर्टलवर तालुका अभियान कक्षामार्फत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली जाते.